दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर || वर्ष ५ वे || अंक १४५ || बुधवार १४ मे २०२५ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# छावा महाराष्ट्र सेनेच्या जालना जिल्हाप्रमुख पदी जोतीराम माने

जालना / प्रतिनिधी

छावा महाराष्ट्र सेनेची नुकतीच बिडकीन (ता.पैठण) येथे दि.११ मे रोजी महत्वाची बैठक पार पडली.या बैठकीत मराठा आरक्षण,सहकार,शेतकरी, आरोग्य,शिक्षण,कामगार संघटनेचे ध्येयधोरणे व विविध आंदोलन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.याप्रसंगी सामाजिक चळवळीतील जोतीराम माने पाटील यांची जालना जिल्हाप्रमुख



पदीसर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली.

या निवडीचे नियुक्ती पत्र छावा महाराष्ट्र सेनेचे प्रमुख किशोर पाटील शिरवत यांच्या हस्ते देण्यात आले.तसेच उर्वरित पदाधिकारी प्रवेश सोहळा व नियुक्ती पत्र कार्यक्रम घेण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे लवकरच विभागीय बैठक घेणार असल्याची माहिती छावा सेना प्रमुख किशोर पाटील शिरवत यांनी दिली.यावेळी मराठवाडा अध्यक्ष मनोज मुरदारे,छत्रपती संभाजीनगर जिल्हाप्रमुख साईनाथ कर्डिले,किरण काळे,अशोक टेके,संतोष कुशेकर,संजय मरकड,फिरोज पटेल,शेखर मात्रे यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# श्री समर्थ विद्यालय घाटंजी ची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत निकाल ९९.४२%

मनोज राऊत / जिल्हा प्रतिनिधी

घाटंजी:- नुकताच वर्ग दहावीचा निकाल जाहीर झालेला आहे त्यामध्ये श्री समर्थ विद्यालय यांनी आपली ही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत शाळेतून प्रथम विभा अशोक धनाडे ९५% द्वितीय श्लोक संजय अग्रहरी ९४.४०%तर तिसऱ्या क्रमांकावर तीन विद्यार्थिनी आहेत वैभवी अविनाश गोंदे ९३.६०%, अनुष्का रुपेश बिलोनी ९३.६०% ,श्रुती प्रमोद तुपे ९३.६०% गुण मिळवत विद्यार्थ्यांनी शाळेची उज्वल निकालाची परंपरा कायम राखली तसेच वर्ग दहावीच्या परीक्षेमध्ये एकूण १७५ विद्यार्थी बसले होते त्यापैकी १७४ विद्यार्थी पास झाले असून शाळेचा निकाल ९९.४२% टक्के लागलेला आहे यामध्ये९० टक्के च्या वरील ०९ विद्यार्थी ,९०ते८० दरम्यान २७ विद्यार्थी ८०ते ७५ या दरम्यान १८ विद्यार्थी व ७५ ते ६० च्या दरम्यान ६० विद्यार्थ्यांनी गुण मिळवत प्राविण्य प्राप्त केले.ङ्या यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणार्या शिक्षकांचे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष श्री मधुसूदनजी चोपडे उपाध्यक्ष निळकंठराव डंभारे सचिव नरेश वैद्य व तसेच मुख्याध्यापक श्री देवदत्त जकाते ,उपमुख्याध्यापक अमोल वैद्य पर्यवेक्षक




अरविंद मडावी, ज्येष्ठ शिक्षक राजेश मदने यांनी व तसेच ङ्गशाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा

# स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मतदार याद्या बनवताना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी सतर्क रहावे!

भोकरदन प्रतिनिधि सद्दाम मिर्झा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या चार महिन्यात घेण्याचे सन्माननीय न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. त्यानुसार मतदार याद्यांचे काम आता करावे लागणार हे काम करत असताना अतिशय सतर्क राहावे यासाठी आम आदमी पार्टी मार्फत जालना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना एक पत्र माननीय तहसीलदार तथा तालुका निवडणूक अधिकारी भोकरदन यांच्या मार्फत देण्यात आलेले असल्याचे बोरसे गुरुजींनी कळविले आहेङ्ग निवेदनात पुढे म्हटले आहे की, जिल्ह्यातील तसेच



तालुक्यातील अनेक मतदार याद्यांच्या मध्ये असे आढळून येते की,मतदार प्रत्यक्ष वेगळ्या ठिकाणी व वार्डात राहतात, त्यांचे नाव दुसऱ्याच वार्डाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट होते. तसेच एकाच व्यक्तीचे नांव अनेक ठिकाणी मतदार यादी मध्ये समाविष्ट असते. या गोष्टी सहज होत नसून काही राजकीय लोकांच्या व राजकीय पक्षांच्या हस्तक्षेपाने निवडणूक विभागातील कर्मचाऱ्यांशी संगणमत करून या गोष्टी घडून येतात. त्यामुळे स्पष्टपणे कर्मचाऱ्यावर योग्य ती जबाबदारी टाकून जो मतदार ज्या वार्डामध्ये राहतो त्याच वार्डाच्या यादीमध्ये त्याचे नांव समाविष्ट करण्यात यावे तसेच एकाच मतदाराचे नांव अनेक ठिकाणी समाविष्ट होऊ नये तसेच बोगस नांवे मतदार यादीमध्ये समाविस्ट होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. सहकार्याची अपेक्षा व्यक्त करून केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याबाबत पार्टी मार्फत विनंती करण्यात आलेली आहेङ्गअन्यथा आम आदमी पार्टी आंदोलनात्मक पवित्रा घेईल असा इशाराही पत्रामध्ये देण्यात आलेला आहे. यावेळी सोळंके पाटिल महजाद खान,फारुखभाई,नाडे साहेब आणि पार्टिचे कार्यकर्ते हजर होते. असे बोरसे गुरुजींनी कळवीले आहे.

# राजमाता जिजाऊ माध्यमिक आश्रम शाळा राणीसावरगांव शाळेचे घवघवीत यश

दै. सूर्योदय :- राम शिंदे गंगाखेड प्रतिनिधी - आश्रम शाळा विभागात जिल्हयात प्रथम मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परिक्षेत तालुक्यातील राणीसावरगाव येथील राजमाता जिजाऊ माध्यमिक आश्रम शाळेच्या यशाची परपंरा प्रति वर्षा प्रमाणे राखण्यात विद्यार्थ्यांनी बाजी मारली यात मुलींनी सर्व प्रथम व व्दितीय व तृतीय येण्याचा मान मुलींनीच मिळवीला शाळेचा एकुण निकाल ९७.३५ % लागला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये



सर्व प्रथम येणारी इमडे ज्योती चिंतामणी ९२.२०% तर व्दीतीय कु.घाळगीर अनुष्का धुराजी ९१.००% तर तृतीय कु.दिव्या प्रभाकर गुट्टे ९०.८०% तर गणित विषयात १०० पैकी १०० गुण घेणारी शेख मुजमिल जिलानी असून विशेष प्राविण्याने पास होणारे ५१ विद्यार्थी आहे. जिल्हयातील एकुण आश्रम शाळा पैकी सर्वात प्रथम येणारी शाळा म्हणुन या यशासाठी इतर मागास व बहुजण कल्याण विभाग परभणी यांनी यशासाठी सहाय्यक संचालक सौ.गित्ता गुट्टे मॅडम व गावातील सरपंच प्रतिनिधी माऊलीभाऊ जाधव राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघ अध्यक्ष (मराठवाडा विभाग) तसेच संस्थेचे सचिव मा.श्री.बाबासाहेब रामजी कांबळे, संस्थेचे अध्यक्ष कुलदीप भैय्या कांबळे व शाळेचे मुख्याध्यापक श्री.केंद्रे मधुकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सर्व वर्ग शिक्षक आणि विषय शिक्षकांना पण या घवघवीत यशा बदल अभिनंदन केले व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या...

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा संपर्क प्रमुख पदी अमोल पारखे यांची निवड

गंगापुर प्रतिनिधी अमोल पारखे अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना ही भारतातील एक प्रमुख प्रत्रकार संघटना आहे जी पत्रकारांच्या हक्काचे रक्षण , व त्यांच्या व्यावसायिक हितसंबंधाचे संरक्षण आणि पत्रकारितेच्या नैतिकतेचा प्रचार करण्यासाठी कार्यरत आहे , यावेळी श्री महेंद्र कुमार संकलेचा प्रदेश उपाध्यक्ष, श्री नागेश गव्हले मराठवाडा सचीवणीस, श्री महावीर साकला शहराध्यक्ष ,श्री सागर जैवाळ जिल्हा उपाध्यक्ष ,श्रीमती सरोज वर्मा शहराध्यक्ष श्री जितेंद्र बोरा जिल्हा सचिव, श्री अनिल काथार सदस्य, श्री बालचंद अलमेरा सदस्य, श्रीमती पायल बुलबुले सदस्य, श्री हरिश्चंद्र विघने जिल्हा उपाध्यक्ष, श्री अमोल पारखे जिल्हा संपर्क प्रमुख, श्री सुभाष शिंदे जिल्हा अध्यक्ष श्री दीपक पवार जिल्हा कार्याध्यक्ष, श्री दत्तप्रसाद अबिलवादे प्रदेश सल्लागार, श्री जगदीश बुलबुले मराठवाडा अध्यक्ष, यांच्या उपस्थितीत ही कार्यकारणी संपन्न झाली असून पत्रकारांसाठी सदैव हितांचाच विचार केला जाईल अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली आहे



# मोखाड्यातील मुरबाटवाडीत राहणाऱ्या आदिवासी कुटुंबे वाड्या,वस्त्या,समस्यांच्या विळख्यात

## आमदार हरिश्चंद्र भोये यांच्या भेटीदरम्यान महिलांनी वाचला समस्यांचा पाढा

दिनेश आंबेकर - मोखाडा तालुक्यातील मो-रांडा पैकी मुरबाटवाडी येथे शेत माळरानावर राहणाऱ्या आदिवासी पाडा गेल्या कित्येक वर्षापासून आदिवासी कुटुंबे, शासनाच्या रस्ते,विद्युत,पाणी,अंगणवाडी,शाळा,या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. मुरबाटवाडी ही वस्ती उशिराने त्या ठिकाणी वस्ती झाल्याचे त्या ग्रामस्थांना सांगत तेथे शासनाच्या सुविधा पोहचायला उशीर झाल्याचे येथील ग्रामस्थांना तालुक्याचे, जिल्ह्याचे अधिकारी सांगत असल्याचे ग्रामस्थ बोलत आहेत.मात्र आमदार हरिश्चंद्र भोये यांच्या येथील महिलांची तक्रार आल्यानंतर त्यांनी रविवारी त्या मुरबाटवाडीला भेट देऊन समस्या जाणून घेतल्या आहेत.मोखाडा तालुक्यातील मुरबाटवाडीत येथे १८ कुटुंबे असून, एकूण १२५ च्या आसपास लोकवस्ती गेल्या ५० वर्षापासून राहत असल्याचे सांगत आहेत,मात्र या मुरबाटवाडी लोकवस्तीला शासनाच्या अनेक सुविधा मिळाल्याच नाही,यामध्ये रस्ते, विहीर,विद्युत,आरोग्याच्या सुविधा, शाळा,अंगणवाडी,असा अनेक समस्यांनी ही वाडी रखडली आहे.त्या



ठिकाणी पिण्याच्या पाण्याची विहीर आहे,परंतु ती विहीर देखील कोसळल्याचे तेथील ग्रामस्थ सांगत आहेत.आम्ही शेत,माळरानावर राहतो,म्हणून आमच्या ह्या गावाची गणना नसून,तुम्ही शेतावर राहता,म्हणून आम्हाला सुविधा मिळत नाही की काय असे ग्रामस्थांनी आमदारांसमोर समस्या मांडल्या.मुरबाटवाडी ग्रामस्थांच्या समस्या सुटाव्यात म्हणून येथील महिलांनी तीन दिवसापूर्वी आमदार हरिश्चंद्र भोये यांच्या जव्हार येथील कार्यालयात भेट देऊन त्यांच्या समस्यांचा पाढा वाचला होता, त्यानुसार आमदार हरिश्चंद्र भोये यांनी तात्काळ रविवारी त्या मुरबाटवाडी भेट देऊन येथील लोकवस्ती व कुटुंबाच्या समस्या जाणून घेतल्या,आणि त्या मुरबाटवाडी,वस्तीच्या समस्या सोडवू असे सांगितले,तसेच ह्या मुरबाटवाडी येथे अजूनही शासनाच्या विविध योजना,निराधार,अपंग,प्रौढ असा योजना अजूनही ह्या मुरबाटवाडी पर्यंत पोहचल्या नाहीत.तसेच येथील कुटुंबांना पिण्याच्या पाण्याची विहीर नाही,यापूर्वी एका विहिरीच बांधकाम केले आहे,ती विहीर देखील कोसळली आहे.त्या कुटुंबांना झीरेचा पाणी पिण्याची वेळ त्या ग्रामस्थांवर आली आहे, असा शासनाच्या सुविधा मिळाल्याच नाहीत.त्या मुरबाटवाडीच्या समस्या जाणून घेऊन लवकरच मार्गी लावू आहे आमदार हरिश्चंद्र भोये यांनी सांगितले.



## संपादकीय

# आक्रोश व अश्रू

पाकिस्तानचे राज्यकर्ते, लष्कर प्रमुख आणि कट्टरतावादी नेते पाकिस्तानला विनाशाच्या मार्गावर नेत आहेत. भारतात दहशतवाद्यांना पाठवून हिंसाचार आणि रक्तपात घडवायचा, लष्करी दलाच्या तळांवर हल्ले करायचे, निरपराध भारतीयांचे बळी घ्यायचे ही मालिका वर्षानुवर्षे चालूच आहे. उरी, पठाणकोट, पुलवामा, पहलगाम अशा हत्याकांडानंतर देशभरात संतापाची लाट उसळली.

दहशतवाद्यांना पाठिंबा आणि संरक्षण देणाऱ्या पाकिस्तानला कायमची अद्दल घडवा, अशी मागणी सर्वस्तरातून सुरू झाली. आता खूप झाले, आता यापुढे पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही अशीच भावना प्रत्येक भारतीयांच्या मनात प्रबळ होत गेली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असिम मुनीर यांची प्रक्षोभक व भडकाऊ भाषणे ही दहशतवादाला उत्तजेन देणारी होती. भारताच्या विरोधात गरळ ओकणारी होती. एका देशाचा लष्कर प्रमुख शेजारी राष्ट्राच्या विरोधात भडकाऊ भाषणे कशी करू शकतो ? असिम मुनीर यांची प्रतिमाच जिहादी जनरल अशी आहे. पहलगाम येथे निरपराध हिंदू पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून दहशतवाद्यांनी पॉईंट ब्लँक गोळ्या घालून त्यांची हत्या केली. महिलांच्या पतीला त्यांच्या डोळ्यांदेखत समोरून गोळ्या घालून त्यांचे कुंकू पुसले. भारतीय संस्कृतीत कुंकू हे अतिशय पवित्र मानले जाते. ते सन्मानाचे व विश्वासाचे प्रतीक आहे. त्या महिलांचा आक्रोश व अश्रू सर्व देशाने बघितले. दहशतवाद्यांना पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण आणि एके ४७ सारख्या स्वयंचलित बंदुका देऊन हिंसाचार घडविण्यासाठी भारतात पाठवले जाते याचे सज्जड पुरावे भारताने जगाला दाखवले आहेत. जा मोदींना जाऊन सांग, असे दहशतवाद्याने पहलगाममधील महिलांना बजावले हा त्यांच्या क्रूरतेचे कळस होता. त्याचा बदला घेण्यासाठीच भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानातील व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. सात शहरातील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. त्यानंतरही पाकिस्तानी सैन्याने सरहद्दीलगत भारताच्या हद्दीतील पंजाब व काश्मीरमधील वस्त्यांवर गोळीबार केला व त्यात निरापराध लोकांचे बळी घेतले. भारताने गुरुवारी रात्री लाहोर, कराची, इस्लामाबाद, फैसलाबाद, पेशावर, रावळपिंडी अशा सर्व महत्त्वांच्या शहरांवर हवाई हल्ले चढवले. भारताने ड्रोन व क्षेपणास्त्रांचा पाकिस्तानी लष्करी तळांवर मारा केला. लाहोरपासून इस्लामाबादपर्यंत पाकिस्तानात ब्लॅक आऊट जारी करण्यात आला. इस्लामच्या नावावर दहशतवादी कारवाया घडविणाऱ्या पाकिस्तानला भारतीय हल्लच्यांपासून स्वत:ला वाचविण्यासाठी रात्री अंधारात राहावे लागले. भारत–पाकिस्तान दरम्यान अघोषित युद्ध सुरू झाले. भारताने पाकिस्तानची पाच लढाऊ विमाने पाडली. कराची बंदराच्या दिशेने भारताच्या विक्रांत युद्ध नौकेने कूच केले आहे. चीन व तुर्की वगळता जगातील कोणत्याही देशाने पाकिस्तानला पाठिंबा दिलेला नाही. भारतावर झालेले दहशतवादी हल्ले आणि विशेषत: पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी धर्म विचारून केलेली २६ हिंदू पर्यटकांची हत्या याने देशातील जनतेचा थरकाप तर झालाच पण पाकिस्तानवर हल्ला करून कठोर बदला घ्यावा अशी जनता मागणी करू लागली. जे जनतेला पाहिजे आहे तेच मोदींनी करून दाखवत आहेत. ऑपरेशन सिंदूर सुरू होताच सारा देश मोदींच्या नेतृत्वाचा जयजयकार करू लागला. मोदींच्या अभिनंदनाचे फलक सर्व देशभर झळकू लागले. पाकिस्तानकडून होणारी घुसखोरी भारतीय सैन्याने रोखलीच पण पाकिस्तानचे साठ हून अधिक ड्रोन नेस्तनाबूत करून हल्ले परतवून लावले.दि. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांचे हत्याकांड केले. तब्बल पंधरा दिवसांनी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केले. भारतीय सैन्य दलाने ज्या सुनियोजित पद्धतीने पाकिस्तानवर ड्रोन व क्षेपणास्त्रांचे हल्ले चढवले, त्यात पाकिस्तानचे नेते व प्रशासनाची पळापळ झालेली दिसते. भारताकडे सैन्य बळ, शस्त्र बळ पाकिस्तानच्या कितीतरी पटीने जास्त आहे. भारतीय सैन्याकडे शिस्तबद्ध, त्यागी भावना तसेच देशासाठी निष्ठेने काम करणारी फौज आहे. भारताची आर्थिक स्थिती पाकिस्तानच्या तुलनने कितीतरी सक्षम व स्थिर आहे. पाकिस्तानने दहशतवादी कारवायातून भारताला डिवचण्याचे काम केले आहे. नरेंद्र मोदींसारखा कठोर व सक्षम पंतप्रधान देशात असताना पाकिस्तानने मोदींनाच आव्हान देऊन स्वत:च स्वत:साठीचा खड्डा खणला आहे. पाकिस्तानात शाहबाज शरीफ यांचे सरकार असले तरी त्यावर लष्कराचा रिमोट आहे. लष्कराच्या नियंत्रणामुळे तिथे सरकारला फार काही अधिकार नाहीत. सेना जे सांगते तेच पाकिस्तानात घडत असते. तिथे सरकारला स्वातंत्र्य नाही. लष्कर प्रमुखच जर जिहादी असतील तर सारे सरकार त्यांच्यामागे फरफटत जाताना दिसते. भारतीय सैन्य दलाने इस्लामाबादसह पाकिस्तानातील प्रमुख शहरांवर हवाई हल्ले केले तेव्हा लष्कर प्रमुख असिम मुनीर हे कुठे आहेत असे प्रश्न विचारले गेले.

# गो.म.वेदक.विद्यामंदिर तळा १०वी निकाल १००%दहावीतही मुलांपेक्षा मुलीच सरस

ता. १२ तळा सुर्योदय विषेश प्रतिनिधी कृष्णा भोसले मंगळवारी एस्? एस्? सी.च्या विद्यार्थ्यांचा दुपारी १ वाजता ऑनलाइन पध्दतीने निकाल जाहीर करण्यात आला यामध्ये तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो.म.वेदक विद्यामंदिर तळा चा एकूण निकाल १००% लागला असून बारावी पाठोपाठ दहावीतही मुलांपेक्षा मुलीच सरस असल्याचे पुन्हा एकदा निकालातून स्पष्ट झाले आहे.यामध्ये गो.म.वेदक विद्यामंदिर शाळेत प्रथम क्रमांक जान्हवी रमेश साळवे ९२.४०%, द्वितीय क्रमांक संस्कृती विजय ठसाळ ९०.८०% व तृतीय क्रमांक श्रावणी योगेश शिर्के ८९.६० % घेऊन उत्तीर्ण झाले

.या केंद्रातून एकूण ७५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी सर्वच्या सर्व ७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याला कलाटणी देणारा हा दहावीचा निकाल असल्याने याकडे विद्यार्थी व सर्व पालकांचे लक्ष लागले होते. ग्रामीण दुर्गम डोंगराळ भाग असलेल्या तळा तालुक्यातील विद्यार्थ्यांनी शिक्षणात नेहमीच चांगल्या प्रकारे प्रगती केलेली दिसत आहे

तालुक्यात तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो.म.वेदक.विद्यामंदिर तळा या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १०वी च्या परिक्षेत मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी प्राचार्य शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# क्रिकेटचा महासंग्राम,शिवशक्ती क्रीडा मंडळ चांदोरे आयोजित युनिटी चषक पर्व ४थे.

द. रा. जि. विशेष प्रतिनिधी : नंदकुमार चांदोरकर

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात वसलेले निसर्गरम्य गाव चांदोरे येथे युनिटी (–२०२५)चषक पर्व ४ थे मोठ्या उत्साहात संपन्न.ङ्ग सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिवशक्ती क्रीडा मंडळ चांदोरे ग्रामस्थ व मुंबई मंडळ चांदोरे यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे अगदी उत्तम प्रकारे आयोजन करण्यात आले. स्थानिक मंडळाचे उपाध्यक्ष विष्णु भोसले यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून चांदोरे ग्रामपंचायतिच्या सरपंच साक्षी शिंदे यांच्या हस्ते रिबीन कट करून ग्राउंडचे उडघटन करण्यात आले, याक्षणी पं. समिती माजी सभापती सुजित शिंदे, माजी सैनिक तसेच सद्या पोलीस क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे विनायक चांदोरकर, सरपंच साक्षी शिंदे, ग्राम पंचायत सदस्यां सायली चाचले, अर्पना लोखंडे यांनी उपस्थिती दर्शवली निमंत्रित केल्याप्रमाणे प्रतिष्ठित मान्यवर, उपस्थित क्रिकेट प्रेमी, चांदोरे कुणबी आली येथील सर्व ग्रामस्थ, मुंबई मंडळ तसेच पंचक्रोशीतील तमाम नागरिक ग्राउंडवर उपस्थित होते.ङ्गविजेता संघ प्रथम क्रमांक म्हणून ३ या विजेत्या संघाला माजी सभापती सुजित शिंदे यांच्या हस्ते ट्रॉफी व चेक,तर उपविजेता द्वितीय क्रमांक या संघाला माजी सैनिक विनायक चांदोरकर आणि द.रा.जि. विशेष प्रतिनिधी पत्रकार नंदकुमार चांदोरकर यांच्या हस्ते ट्रॉफी व रोख रक्कम देऊन तसेच मेडल अर्पण करून प्रत्यक प्लियरला सन्मानित करण्यात आले.ङ्गसामनावीर म्हणून आकाश इंदुलकर याने आपला ठसा उमटवळा, उत्कृष्ठ गोलंदाज हा मान पियुष इंदुलकर तर उत्कृष्ठ फलंदाज अस्मित इंदुलकर,उत्कृष्ठ क्षेत्ररक्षणाची करण इंदुलकर याने उत्तम प्रकारे कामगिरी बजावलीङ्गतसेच विजेता व उपविजेता संघातील खेळाडूंना मंडळातर्फे मेडल अर्पण करण्यात आले, सकाळी १० वाजल्या पासुन संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सामने चालू होते. उन्हाची पर्वा न करता सर्वच क्रिकेट प्रेमी अगदी आनंदाच्या वातावरणात







क्रिकेटचा महासंग्राम पाहत होते अगदी आनंदाच्या वातावरणात हा क्रिकेटचा महासंग्राम पार पडला. त्याक्षणी पंचक्रोशीतील सर्व क्रिकेट प्रेमी,चांदोरे येथील स्थानिक मंडळ व मुंबई मंडळाचे सर्व सभासद बंधु व पंचक्रोशीतील बहुसंख्य नागरिक व सर्व क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.

# देव्हारे विदयालयाने राखली दहावीच्या १००% निकालाची परंपरा

मंडणगड प्रतिनिधी

आर. व्ही. बेलोसे फाउंडेशन संचलित देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय देव्हारे या विद्यालयाचा इयत्ता १०वी चा निकाल १००% लागला आहे. त्यामुळे देव्हारे विदयालयाने आपली उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे . १)कु. आर्या संदीप सापटे ८६.८०%ङ्ग२) कु. सुदर्शन संतोष चोरगे ८५.६०%ङ्ग)३)कु. तन्वी सुनील बोथरे ८३.८०%ङ्गयांनी यश संपादन करून विद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. त्यामुळे विद्यालयाचे प्राचार्य श्री. रामचंद्र कापसे सर, संस्था पधादिकारी, स्थानिक कमिटी अध्यक्ष व सभासद, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, व पालक यांनी सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे. विदयालयाच्या उत्कृष्ट निकाल परंपरे बाबत श्री. कापसे सर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दहावी निकाल रायगड जिल्ह्यातील ९६.२५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण: मुलांच्या तुलनेत मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जास्त

विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या दहावी परिक्षेचा निकाल मंगळवारी (दि.१३) ऑनलाईन जाहिर करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील ९६.२५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालात मुलांच्या तुलनेत मुलींनी बाजी मारली असून, मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९७.२६ टक्के तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९५.३१ टक्के इतके आहे. दहावी परीक्षे उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी अभिनंदन केले असून, परीक्षेत यश न मिळालेल्या विद्यार्थांनी खचून न जाता पुन्हा जोमाने अभ्यास करून यश प्राप्त करावे असा सल्ला दिला आहे.ङ्गङ्गमहाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च, २०२५ मध्ये इयत्ता दहावीची परिक्षा घेण्यात आली होती. या परिक्षेचा निकाल मंगळवारी मंडळाच्या संकेतस्थळांवर दुपारी १ वाजता जाहीर करण्यात आला. दहावीच्या परिक्षेसाठी रायगड जिल्ह्यातून ३५ हजार ६१२ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी ३५ हजार ३९४ विद्यार्थी परिक्षेला सामोरे गेले. यामधील ३४ हजार ६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, १ हजार ३२७ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.२५ टक्के इतके आहे. ङ्गङ्गरोहा तालुक्याचा सर्वात जास्त निकालङ्गङ्गरायगड जिल्ह्यात दहावी परीक्षेत रोहा तालुक्याने बाजी मारली आहे. रोहा तालुक्यातील ९७.१२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर पनवेल ९६.८८, उरण ९५.७८, कर्जत ९६.६८, खालापूर ९३.७५, सुधागड ९१.२८, पेण ९५.४९, अलिबाग ९६.७६, मुरुड ९६.१९, माणगाव ९६.४८, तळा ९६.४०, श्रीवर्धन ९५.८३, म्हसळा ९५.५३, महाड ९७.०७, पोलादपूर ९५.०७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## दहावी-बारावी निकालानंतर प्रवेश जाहिरातींचा मारा विद्यार्थ्यांनी सावधगिरी बाळगावी!

दापोली, ता. १३ मे (प्रतिनिधी):ङ्गङ्गदहावी आणि बारावीचे निकाल जाहीर झाल्यानंतर सध्या सर्वत्र महाविद्यालयीन प्रवेश जाहिरातींचे पेव फुटले आहे. सोशल मीडियावर, रस्त्यांवर, आणि विविध माध्यमांतून विविध महाविद्यालयांचे आकर्षक बॅनर झळकत आहेत. ‘‘तुमचे उज्वल भविष्य आमच्या हातात‘‘ असे दावे करणाऱ्या अनेक संस्थांकडून विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.ङ्गङ्गयाच पार्श्वभूमीवर वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोली या सुवर्ण महोत्सवी शिक्षण संस्थेने एक सकारात्मक आणि मार्गदर्शक उपक्रम हाती घेतला आहे. संस्थेच्या जाहिरातीत केवळ अभ्यासक्रमाची माहिती न देता, इतर ‘‘अनधिकृत‘‘ संस्थांकडून विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये याबाबत स्पष्टपणे इशारा देण्यात आला आहे.विद्यापीठाने बंदी घातलेल्या महाविद्यालयांपासून सावध रहा!ङ्गदापोली तालुक्यातील तीन महाविद्यालयांना विद्यापीठाकडून प्रवेश बंदी घालण्यात आलेली आहे. तरीही काही ठिकाणी विद्यार्थ्यांना दिशाभूल करून प्रवेश दिला जात आहे, जे नंतर त्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर गंभीर परिणाम करू शकते.राडकर बेलोसे महाविद्यालय सुवर्णमहोत्सवी शैक्षणिक परंपरा:या महाविद्यालयात .., .., .. च्या प्रथम वर्ष प्रवेशांसाठी प्रक्रिया सुरू असून, तज्ञ व अनुभवी प्राध्यापक, सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळा, भव्य क्रीडांगण, व्यायामशाळा, राष्ट्रीय सेवा योजना एनसीसी, मोफत एमपीएससी-यूपीएससी मार्गदर्शन व कॅम्पस इंटरव्ह्यू सुविधा आदी विविध शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत.प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी केले आवाहन:‘‘विद्यार्थ्यांनी महाविद्यालय निवडताना केवळ बॅनरवरून किंवा जाहिरातींवरून निर्णय घेऊ नये. महाविद्यालय विद्यापीठ मान्यताप्राप्त आहे की नाही, प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र आहे का, याची खात्री करूनच प्रवेश घ्यावा. अन्यथा शिक्षणाचं नुकसान होण्याची शक्यता असते,’’ असे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी आवर्जून सांगितले.;

## ज्ञानदीप विद्यामंदिर दापोली शहर (माध्यमिक) दहावीचा निकाल १०० टक्के

दापोली १३:- ज्ञानदीप विद्यामंदिर दापोली शहर (माध्यमिक) या शाळेचा एस.एस.सी मार्च २०२५ परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून प्रशालेची उज्वल परंपरा कायम राखली आहे.ङ्ग कुमार आर्य शैलेश कोंडविलकर हिने ९८.४० गुण मिळवून प्रथम क्रमांक व कुमार निनाद राजेंद्र पेवेकर याने ९८.४० गुण मिळवून प्रथम कमांक मिळवला आहे. तसेच कुमार पार्थ शैलेश कोंडविलकर याने ९७.६० व्दितीय कमांक मिळवला आहे. कुमार ईशान वैभव बोरकर याने ९४.८० तृतीय क्रमांक व कुमार. श्लोक अरूण सोनवणे याने ९४.८० तृतीय कमांक मिळवला आहेङ्गयशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष सरोज मेहता मॅडम, उपाध्यक्षा श्रीम. शांता सहस्त्रबुद्धे मॅडम, संस्था सेक्रेटरी श्री. सुजयशेठ मेहता, संस्था सहसेकेटरी श्री विश्वासकाका कदम, खजिनदार हसमूख जैन, सर्व संचालक, मुख्याध्यापक श्री मधुकर मोरे यांनी यशस्वी विदयार्थी व मार्गदर्शक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.
















## चंद्रकांत बाईत माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आबलोली इयत्ता १० वी बोर्डाचा निकाल १००%

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील आबलोली येथील चंद्रकांत बाईत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आबलोली या विद्यालयातील इयत्ता १० वी सन १९२४-२५ चा बोर्डाचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून दहावी बोर्डाच्या परिक्षेसाठी या विद्यालयातील एकुण ५१ विद्यार्थी परिक्षेसाठी बसले होते हे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या विद्यालयाने १००% निकालाची अनेक वर्षाची परंपरा कायम राखली असून कु. श्रेयस सतिश विचारे, कुमारी तन्वी अनिल मोरे यांनी प्रत्येकी ९८.४०% गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे तर कुमारी किमया दिनेश नेटके हिने ९५.००% गुण मिळवून व्दितीय क्रमांक पटकावला आहे. तर ङ्गकुमारी वैष्णवी विकास मेस्त्री हिने ९४.६०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे आणि कुमारी श्रावणी महेश साळवी हिने ९३.४०% गुण मिळवून चौथा क्रमांक पटकावला तर कुमारी आर्या धनदिप साळवी हिने ९०.४०% गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकावला आहे या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे लोकशिक्षण मंडळ आबलोली या संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांतशेठ बाईत, कार्याध्यक्ष सचिनशेठ बाईत, मुख्याध्यापक डि. डी. गीरी यांचेसह शाळा व्यवस्थापन कमीटी पदाधिकारी व सदस्य तसेच शिक्षक,

कर्मचारी आणि विविध सामाजिक, धार्मिक संघटनांचे पदाधिकारी यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत

## पणदेरी पेवे पंचक्रोशी हायस्कूल पणदेरी चा १०० % निकालाचा षटकार

मंडणगड - प्रतिनिधी...

मंडणगड तालुका विकास मंडळ १४२८ मुंबई संचालित ङ्गपणदेरी पेवे पंचक्रोशी हायस्कूल पणदेरी या प्रशालेचा इ.१० वि बोर्ड परीक्षेचा सन २०२५ चा निकाल १०० % लागला आहे. विशेष म्हणजे म्हणजे विद्यालयाने सलग ६ वर्ष १००% निकाल लावून १००% निकालाचा षटकार लगावला असून पुन्हा एकदा ग्रामीण भागातील आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी केलेल्या या कामगिरी बद्दल मंडणगड तालुका विकास मंडळ १४२८ मुंबई या संस्थेचे अध्यक्ष भाईसाहेब जगताप व इतर सर्व पदाधिकारी, सर्व सदस्य , प्रशालेचे प्र.मुख्याध्यापक श्री. गवारी सर, सर्व शिक्षक ,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, शिक्षक पालक संघ, शालेय समिती, माजी विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे..बोर्ड परीक्षा २०२५ निकाल

प्रथम क्रमांक कुमारी नगरकर अश्विनी सतीश / सोनाली ८६.४० %

द्वितीय क्रमांक कुमारी शिगवण वेदिका सखाराम / रुतिका ८०.६० %

तृतीय क्रमांक ङ्गकुमारी शिगवण सायली प्रविण/ पायल ७९.४० % विशेष प्राविण्य - ०७ विद्यार्थी प्रथम श्रेणी - १८ विद्यार्थी द्वितीय श्रेणी - ०५ विद्यार्थी एकूण ३० विद्यार्थी

प्रशालेच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# लोकमानस

## १ मुलखांवेगळी माणस

कल्पृक्षापासून कल्पक वस्तूची निर्मिती

नारळाला कल्पवृक्ष असे संबोधले जाते. जगातील प्रमुख नारळ उत्पादक देशांचा समावेश असलेल्या ‘एशियन अ‍ॅण्ड पॅसिफिक कोकोनेट कम्युनिटी’ या संघटनेने (एपीसीसी) ने २००९ मध्ये दोन सप्टेंबर हा दिवस जागतिक नारळ दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले. त्या माध्यमातून जागतिक नारळ शेती व उद्योगाचे महत्त्व व विस्तार वाढीस अजून चालना मिळाली. भारत हा देखील नारळ उत्पादक देश असून कोकणातील शेतकऱ्यांचे ते अर्थकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पीक आहे. धार्मिक कार्यापासून रोजच्या जेवणापासून ते झावळ्या, करवंटी, सोडणे आदींचाही विविध कामांसाठी वापर होतो कोकणातील भोगवे (जि. सिंधुदुर्ग) येथील राजाराम प्रभू यांनी नारळाच्या विविध भागांपासून कलात्मक, गृहोपयोगी वस्तू निर्मितीचे कौशल्य आत्मसात करून नारळाचे मूल्यवर्धन साधले आहे. सुमारे ५० हून अधिक प्रकारच्या वस्तू तयार करून व्यवसायाला चालना देत आर्थिक उलाढाल वाढवली आहे. कृषी पर्यटन केंद्राच्या उभारणीतून त्याला मोठा आधार मिळाला आहे.

लहानपणी गुरे राखण्यासाठी प्रभू जायचे. अंगभूत कला कौशल्य, सर्जनशीलता व नवे काही करण्याची आस असलेले प्रभू माळरानावरील गवत, झाडांची मुळे यापासून काहीतरी कलाकृती वा वस्तू बनविण्याचा प्रयत्न करायचे. विहीर खोदताना त्यांना एक दगड आढळला. त्यापासून आकर्षक पुतळा तयार केला. जंगलात फिरताना एकदा कुंबया वनस्पतीचे सुकलेले मोठ्या आकाराचे मूळ दिसले. त्यापासून ‘ॲनाकोंडा’ अजगराची प्रतिकृती तयार केली. ती खूप आकर्षक झाली होती. पण त्याचे मूळ कुजल्याने ती फार दिवस टिकू शकली नाही. पण इथेच प्रभू यांच्या कलाकारीला अधिक चालना मिळाली. बागेतील नारळांच्या विक्रीतून उत्पन्न मिळायचे. पण त्याच्या झावळ्या, करवंट्या, सोडणी आदी वाया जाणाऱ्या बाबींचे मूल्यवर्धन करून त्यापासून गृहोपयोगी वस्तू तयार करण्याचा छंद त्यांना जडला. त्यातून एकेक करीत आजमितीला पन्नासहून अधिक प्रकारच्या वस्तूंचा जन्म झाला आहे.

प्रभू यांनी नारळाच्या झाव्ल्यापासून समई, पेन स्टॅन्ड, चहाचा कप, घरटे, कंदील, टोपी, वाइन ग्लास, बाउल, चमचे, राखी, फुलदाणी अशा शोभेच्या वस्तू तयार केल्या आहेत तर झावळांपासून आंबा बॉक्स (एक ते दोन डझन क्षमता). त्याचे वरचे आवरण सुपारीच्या पोयीपासून तयार केले.झावळ्यांपासून आंबा करंडी देखील. त्यात दोन- तीन डझन आंबे सहज राहतात. पर्यावरणपूरक व दिसायला अतिशय सुंदर असल्याने देशी-परदेशी पर्यटकांना ती भुरळ घालते आहे.झावळ्यांपासून आकर्षक हिरव्या रंगाची टोपी. जिच्या प्रेमात परदेशी पर्यटक पडले आहेत.या वस्तूंच्या किमती प्रकार व गुणवत्तेनुसार ५० रुपयांपासून ते एकहजारांपर्यंत आहेत. पर्यटन केंद्रात येणारे ग्राहक वस्तू खरेदी करतात. स्थानिक ठिकाणीही विक्री होते.दिवाळी, सुट्टी व उन्हाळी सुट्टी हे मुख्य हंगाम असतात. हा काळ पकडला तर एक लाखांपर्यंत उलाढाल वस्तू विक्रीतून होते.मुख्य म्हणजे कोणत्याही यंत्रांचा आधार न घेता केवळ हस्तकौशल्यातून वस्तू तयार केल्या आहेत.तारकर्ली येथील एका व्यावसायिकाकडे प्रभू यांच्या वस्तू विक्रीसाठी होत्या. एका पर्यटकांकडून माशांच्या प्रतिकृतीची मागणी झाली. मात्र तशी तयार केलेली नव्हती. मात्र हे आव्हान स्वीकारून नारळाच्या झावळ्यांपासून तशी प्रतिकृती बनवण्यात प्रभू यशस्वी झाले. एका परदेशी पर्यटकाला ती पसंत पडून त्याने चांगली किमतही दिली.एकूणच,नारळा सारख्या कल्पृक्षापासून प्रभू यांनी शोभेच्या वस्तू बनवत स्वताला आगळा वेगळा कलाकार म्हणून सिध्द केले आहे.

## २ वाद संवाद

महाराष्ट्रातील मराठी शाळांच्या दुरावस्थेला जबाबदार कोण?

१ विद्या भट शिक्षिका

मुंबई मराठी माणसाची,नाही कुणाच्या बापाची असे नारे देत एकेकाळी महाराष्ट्राशी जोडल्या गेलेल्या मुंबईत गेल्या सहा वर्षांमध्ये मराठी माध्यमांच्या सुमारे ४० शाळांना टाळे लागलेले आहे. या ४० शाळांमधील सुमारे ५० हजाराहून अधिक मुलांनी मराठी ऐवजी इतर किंवा इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश घेतला आहे. हि अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर बाब आहे. याचे कारण म्हणजे आजच्या जागतिकीकरणाच्या प्रचंड रेट्यात इंग्रजी भाषा हि सर्वार्थाने महत्वाची भाषा ठरलेली आहे. शालेय स्तरावरच विद्यार्थी जर इंग्रजी शिकतील तर पुढे उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तरावर आणि करिअर याकरिता देखील इंग्रजी महत्वाची असल्याने पालकांचा भर हा इंग्रजी शाळांकडे दिसतो. हा काळाचा महिमा आहे आणि तोही अपरिहार्य आहे. याला जबाबदार कुणालाही धरता येणार नाही.

२ सुरेश नारखेडे ग्रंथपाल

अमृताते पैजा जिंकणारी अशी आपली मराठी भाषा आहे हे अनेकदा वाचून आणि ऐकून झालेले असले तरी आजकाल प्रत्येक मराठी कुटुंबाला अगदी गरिबांना देखील आपला पाल्य हा इंग्रजी हायफाय शाळेत शिकायला हवा असेच वाटते. त्यामुळे अगदी सरकारने मराठी शाळांना मोफतच्या अनेक सवलती देऊन सुद्धा पालक आपल्या मुलांना मराठी शाळांमध्ये घालायला तयार नाहीत हे वस्तुस्थिती आहे आणि शोकांतिका देखील. परंतु असं असलं तरी प्रत्येक शाळेत सरकारने मराठी विषय हा सक्तीचा करायला हवा आणि तसा आदेश द्यावा असं वाटत. त्यामुळे आपली मायबोली किमान आपलीच मुलं बोलू शकतील.

## ३ चलती क नाम गाडी

डिफेंडरची पहिली रॅली-रेड प्रोटोटाइप चाचणी पूर्ण

मूळ ब्रिटिश साहसी ब्रँड डिफेंडरने मोरोक्कोमध्ये डिफेंडर डाकार ७- सह प्रोटोटाइप चाचणी क्रियाकलाप पूर्ण करून जागतिक रॅली-रेड चॅम्पियनशिप मध्ये प्रवेश करण्यासाठी तयारी वेगवान केली आहे, तसेच दोन उत्कृष्ट ड्रायव्हर्सना करारबद्ध केले आहे.चौदा वेळा डाकार रॅली विजेता स्टीफन पीटरहॅन्सेल उदयोन्मुख प्रतिभा रोकास बासियुस्का सोबत अंतिम साहसासाठी डिफेंडर रॅली संघात सामील होईल. फ्रेंच ड्रायव्हर पीटरहॅन्सेल मोरोक्कोमधील डिफेंडर रॅली संघात सामील झाला, जानेवारी २०२६ मध्ये डकार रॅलीमध्ये स्पर्धा करण्यासाठी तयारी सुरू करताना डिफेंडर डाकार ७- च्या पहिल्या प्रोटोटाइपसह प्रारंभिक चाचणी क्रियाकलाप यशस्वीरित्या पूर्ण केला हा कार्यक्रम जगातील सर्वात कठीण लांब-अंतराच्या ऑफ-रोड शर्यती म्हणून प्रसिद्ध आहे.

क्षमता आणि टिकाऊपणासाठी डिझाइन आणि इंजिनिअर केलेला डिफेंडर, आयकॉनिक आणि अटळ ४४, डकार रॅलीमध्ये त्याचे काम पदार्पण करेल, जिथे तीन डिफेंडर डाकार ७- उत्पादन-आधारित कारसाठी स्टॉक श्रेणीमध्ये स्पर्धा करतील. २०२६ च्या वर्ल्ड रॅली-रेड चॅम्पियनशिप (२) च्या उर्वरित फेऱ्यांमध्ये दोन कारची एंट्री स्पर्धा करेल.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
बुधवार १४ मे २०२५



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## पीएस बने इंटरनॅशनल स्कूलची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

देवरूख : महाराष्ट्रीय शिक्षण संस्था संचलित पीएस बने इंटरनॅशनल स्कूल साडवली या शाळेने आपली १००% निकालाची परंपरा कायम राखत यावर्षीही माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२५ परीक्षेत १००% निकाल देऊन घवघवीत यश प्राप्त केले आहे.

त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत संस्थेच्या भांडूप येथील पराग इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज नेही १००% निकाल लागला असून आपली अनेक वर्षांची परंपरा कायम ठेवली आहे .ङ्कङ्कु. साई विशाल आंबेकर याने ९७.०८% मिळवून पीएस बने इंटरनॅशनल स्कूल मधे प्रथम क्रमांक पटकावला आहे तर कु. मधुरा झगडे हीने ९२.२०% मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे.याप्रसंगी मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांचे शाळेचे संस्थापकीय अध्यक्ष बाळकृष्ण बने व सचिव माजी आमदार सुभाष बने व पीएस बने स्कूलचे संचालक माजी जिप अध्यक्ष रोहन बने यांनी अभिनंदन केले.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना महत्त्व देऊन विद्यार्थी विकास घडवण्याचे कार्य हे केवळ योग्य व्यवस्थापन, शिक्षकांची मेहनत, पालकांचे सहकार्य यामुळे घडून येते आणि म्हणूनच शाळेला हे यश संपादन करता आले. असे मत यावेळी संस्थेचेवतीने रोहन बने यांनी व्यक्त केले.या यशामुळे पीएस बने इंटरनॅशनल स्कूल साडवलीने पुन्हा एकदा शैक्षणिक क्षेत्रात आपली विश्वासार्हता आणि गुणवत्ता सिद्ध केली आहे.

## म्हसळा तालुक्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला दे धक्का ; देवघर गाव ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश गावच्या विकासासाठी लागेल तेवढा निधी उपलब्ध करून देईन मंत्री भरत गोगावले यांची ग्वाही

द. रा. जि. उपसंपादक
संतोष उध्दरकर.

म्हसळा:रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्या मार्फत आमच्या गावातील विकासकामे मार्गी लावण्यात आली. यापुढे आमच्या गावाचा विकास करण्याकरता आम्ही शिवसेनेसोबत आहोत असा निर्धार करीत देवघर गावचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना उपजिल्हाधिकारी अमित महामुनकर, महिला आघाडी तालुका प्रमुख रीमा महामुनकर, भाजप तालुका चिटणीस सुनील विचारे, ग्रामपंचायत सदस्य साक्षी महामुनकार यांच्यासह देवघर गाव येथील ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला.भरत गोगावले यांच्या



माध्यमातून बरेच वर्षे रखडलेल्या अंतर्गत रस्त्याचे काम झाले असल्याने तसेच आणखी विकास कामाचे आश्वासन दिल्याने आम्ही हा पक्ष प्रवेश केला असल्याचे या ग्रामस्थांनी सांगितले. शिवसेनेत पक्ष प्रवेश केलेल्या सर्वांचा मानसन्मान ठेवला जाईल गावाच्या विकासासाठी तुम्ही आलात. त्या विकासासाठी लागेल तेवढा निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही भरत गोगावले यांनी दिली. यावेळी जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, अनिल नवगणे,उपजिल्हा प्रमुख मोरे, युवासेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, रवींद्र लाड, तालुका प्रमुख प्रसाद बोर्ले, अमोल पेंढारी, बाबू बनकर, राजेश पदरथ, स्वप्नील चांदोरकर,दीपेश जाधव , गौरी करडे,अरविंद शिंदे आणी असंख्य शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थीत होते.

## वाचू आनंदाने उपक्रमास पेठमाप येथे वाचकांचा प्रतिसाद..

चिपळूण प्रतिनिधी – प्रदीप पवार

चिपळूण नगर परिषदेने लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या सहयोगाने वाचू आनंदाने हा उपक्रम सुरू केला आहे. रविवारी पेठमाप येथील संत गाडगेबाबा नगरातील विठ्ठल मंदिरात हा उपक्रम पार पडला. परिसरातील वाचकांनी याला चांगला प्रतिसाद दिला. माजी उपनगराध्यक्ष बापू काणे व अन्य मान्यवरांच्या हस्ते विठ्ठलाला श्रीफळ अर्पण करण्यात आले. जवळपास दोन तास या



ठिकाणी नागरिक वाचनात मग्न झाले होते. या वेळी माजी नगराध्यक्षा सावित्री होमकळस, माजी उपनगराध्यक्ष रतन पवार, माजी नगरसेविका स्वाती दांडेकर, इनायक मुकादम, माजी नगरसेवक रामशेठ रेडीज, माजी नगरसेविका गौरी रेळेकर, आंबेडकर वाचनालयाचे सुनील खेडेकर, प्रदीप पवार, सुमेध करमरकर, प्राची जोशी, विलास महाडिक, कैसर देसाई, प्रा. विनायक होमकळस, समीर कोवळे , नगरपरिषद प्रतिनिधी बापू साडविलकर आदी उपस्थित होते. पुढील रविवारी माजी नगरसेवक रामशेठ रेडिजे यांच्या पुढाकाराने त्यांच्या धामणवणे येथील जंगलामध्ये वाचू आनंदाने हा उपक्रम पार पडणार आहे. सकाळी साडेसात वाजता रेडीज पेट्रोल पंप येथून वाचकांच्या जाण्याची व्यवस्था वाहनाच्या माध्यमातून केली जाणार आहे. पुस्तक वाचनाबरोबरच जंगल वाचनाचाही उपक्रम या ठिकाणी होणार असल्याचे प्राची जोशी यांनी सांगितले.



**मंडणगड शहरातील साईनगर येथे ‘‘वीरशैव माहेश्वर लिंगायत समाजाच्या वतीने मंडणगड ‘‘ तर्फे ‘‘श्री बसवेश्वर जयंती‘‘ लिंगायत समाज बंधू भगिनींच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाली.**

## संचालित संतोषभाई मेहता इंग्लिश मिडीयम स्कूल, दापोली एस.एस.सी परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

दापोली१३ :-ज्ञानदीप दापोली संचालित संतोषभाई मेहता इंग्लिश मिडीयम स्कूल, दापोली इ.१० वी चा निकाल उत्कृष्ट लागला असून आयुषी अमोल उपलप (९९.००%) प्रथम क्रमांक मिळवतानाच दापोली तालुक्यातील इंग्रजी माध्यमातही आयुषी तालुक्यात प्रथम आली आहे.पुर्णश्री विनायक सामल ९५.४०% द्वितीय क्रमांक,आयुष नितिन वागळे९४.६०%तृतीय क्रमांक,सौम्या जगदीश शिर्के ९४.६०% मिळविला आहे.ङ्गया परीक्षेत ५७ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्या पैकी



५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.विशेष कौतुकाची बाब म्हणजे या पैकी १२ विद्यार्थ्यांनी ९०टक्के व त्यापेक्षा जास्त मार्क मिळविले आहेत.तर ४० विदयार्थी विशेष प्राविण्यासह व ११ विदयार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण, द्वितीय श्रेणीत ०३विद्यार्थी व पास श्रेणीमध्ये ०२ उत्तीर्ण झालेले आहेत.प्रशालेने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष सरोज मेहता,चिटणीस सुजय मेहता,संचालक सुयोग मेहता,स्कूल कमिटीचेअरमन संकेत मेहता व मुख्याध्यापिका चंदाली पारकर व शिक्षकांनी अभिनंदन केले.

## ‘‘आर आर वैद्य इंग्लिश मिडियम स्कूल दापोलीचा माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल १००.टक्के

दापोली १३ :- आर्वी बोले से एज्युकेशन फाउंडेशन संचालक आर आर वैद्य इंग्लिश मीडियम स्कूल दापोली चा २०२५ चा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून मेहरिन इम्रान मुल्लाजी ही विद्यार्थिनी ९३.००%गुण मिळवून प्रथम आली आहे.मोहमद साद सिकंदर चिपळूणक हा ९०.४०%गुण मिळवून द्वितीयसिमरन फय्याज कालावे ९०.००.%गुण मिळवून तृतीय...श्रेया संदिप नवाले ८६.४०%चौथा क्रमांक.संघर्षा विरेंद्र येलवे ८०.२० % ५ वा क्रमांक ङ्गएकूण ४७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.त्या पैकी १० विशेष योग्यता १८प्रथम श्रेणी मध्ये १२ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणीत व ०७ तृतीय श्रेणी मधे उत्तीर्ण झाले.शाळेच्या या दैदीप्यमान यशाबद्दल आर व्ही बेलोसे एज्युकेशन फाउंडेशन चे सभापती धनंजय लक्ष्मणराव यादव संस्थेचे सचिव डॉ. दशरथ भोसले.उपसभापती प्रियदर्शन बेलोसे सहसचिव अनंतराव सणस,संचालिका जानकी बेलोसे ,सुनिता बेलोसे सर्व संचालक मंडळ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षक वृंदाचे शिक्षकेतर कर्मचारी व प्रशालेच्या मुख्याध्यापिका भक्ती महाडिक याचे विशेष अभिनंदन केले. शाळेच्या उज्वल यशाबद्दल दापोलीतील नागरिक व पालक यांनी कौतुकाचा वर्षांव करून समाधान व्यक्त केले.

## संजीवनी डीएमएलटी नर्सिंग कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा

चिपळूण : संजीवनी प्रशिक्षण संस्था संचलित संजीवनी नर्सिंग कॉलेजमध्ये




दि. १२ मे रोजी परिचारिका दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव सौ. हर्षा वाघुळदे वरिष्ठ नर्सिंग अधिकारी श्री.निलेश घोलप आणि समुदाय आरोग्य अधिकारी काजल सराटे आणि राजीव कांबळे यांची यांची उपस्थिती लाभली.ङ्गकार्यक्रमाच्या सुरुवातीला हर्षा वाघुळदे,निलेश घोलप व काजल सराटे यांचे नयना तांबे व सानिका ठसाळे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच मान्यवरांनी शारदास्तवन व दीपप्रज्वलन केले. नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना शिक्षिका नित्या घोलप, निलेश घोलप, काजल सराटे यांनी नर्सेस डे बद्दल मार्गदर्शन केले. तसेच नर्सेस डे निमित्त वेगवेगळे उपक्रम संजीवनी कॉलेजमध्ये घेण्यात आले, त्यामध्ये भाषण स्पर्धा पोस्टर्स, वादविवाद, स्कीट, क्लास डेकोरेशन, रॅम्प वॉक, प्रश्नमंजुषा स्पर्धा अशा वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाला कॉलेजच्या सेक्रेटरी हर्षा वाघुळदे तसेच शिक्षिका नित्या घोलप, काजल मानकर, आदिती पटवर्धन, सारिका वेळेकर, सानिका ढसाळे, नयना तांबे, रसिका भालेकर तसेच कर्मचारी राजीव कांबळे, मयुरी शिगवण, अवंतिका जंगम, वृषाली मालप, वैदेही नागेश, धनश्री सुतार, धोंडीराम पेंढामकर, प्रकाश पवार या सर्वांचे उपस्थिती लाभली.

## १७ मे रोजी मौजे शेवरे येथे भव्य समाज मंदिराचे उदघाट्न सोहळा

मंडणगड प्रतिनिधी मंडणगड तालुक्यातील मौजे शेवरे येथे कार्यसम्राट आमदार महाराष्ट्राचे गृह राज्य मंत्री योगेश दादा कदम यांच्या फंडातून बांधण्यात आलेल्या भव्य समाज मंदिराचे उदघाट्न सोहळा १७मे २०२५ रोजी होणार असून या सोहळ्या निमित्त श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे या भव्य दिव्य कार्यक्रम निमित्ताने महाप्रसाद, लहान मुलांच्या खेळाच्या स्पर्धा, महिलांसाठी हळदीकुंकू, सुस्वर भजन, मान्यवरांचे सत्कार समारंभ, व रात्री सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )